नोंमनि/का.10/ता.त.पा/परि./311/2018

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक

महाराष्ट्र राज्य पुणे-1

दि.26/10/2018

**आदेश :-**

ज्याअर्थी महालेखापाल नागपुर व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे. कार्यालयाने सह दुय्यम निबंधक व सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या केलेल्या तपासणीमध्ये तसेच तात्काळ तपासणीमध्ये. (1) सर्व प्रकारचे विकसन करार / विकसन करारनाम्याचे हक्काच्या हस्तांतरणाचे दस्त (Deed of Assignment of Development Right). (2) विकसन करारनाम्याचे पुरवणी करारनांमे. नोंदविण्यात आलेल्या दस्तऐवजामध्ये योग्य बाजारमुल्य / मोबदला परिगणीत न केल्याने शासनाचे मुद्रांक शुल्क व नोंदणी फी चे प्रचंड नुकसान होत असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

ज्याअर्थी तात्काळ तपासणी संदर्भात या कार्यालयाने काढलेल्या 24/11/2014 च्या परिपत्रकाची योग्य व प्रभावी अंमलबजावणी क्षेत्रीय स्तरावर दुय्यम निबधक / मुद्रांक जिल्हाधिकारी / नोंदणी उपमहानिरीक्षक / अपर मुद्रांक नियंत्रक यांच्याकडुन होत नसल्याने मुद्रांक शुल्क हानी प्रचंड प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

आणि ज्याअर्थी मुद्रांक शुल्क गळती थांबविण्यासाठी तात्काळ उपाययोजना करणे क्रमप्राप्त झाले आहे.

त्याअर्थी सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक मुंबई / नागपुर / ठाणे / नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती / लातुर व अपर मुद्रांक नियंत्रक मुंबई यांचे अधिपत्याखालील सह दुय्यम निबंधक / दुय्यम निबंधक कार्यालयाचे स्तरावर (1) सर्व प्रकारचे विकसन करार / विकसन करारनाम्याचे हक्काच्या हस्तांतरणाचे दस्त (Deed of Assignment of Development Right). (2) विकसन करारनाम्याचे पुरवणी करारनांमे या दस्तऐवजांची नोंदणी दस्त अभिनिर्णीत असल्याशिवाय करु नये. असे आदेशीत करण्यात येत

आहे. असे दस्त परस्पर नोंदविल्यास संबंधीतावर शिस्तभगांची कार्यवाही करण्यात येईल उक्त आदेश तात्काळ अंमलात येत आहे.

सही/- (अनिल कवडे)
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रती,**

1) अपर मुद्रांक नियंत्रक, प्रधाण मुद्रांक कार्यालय, मुंबई.
2) नोंदणी उपमहानिरीक्षक तथा मुद्रांक उपनियंत्रक मुंबई / नागपुर / ठाणे / नाशिक / पुणे / औरंगाबाद / अमरावती / लातुर. यांना माहीतीस्तव व योग्य कार्यावाहीस्तव.
3) सर्व सह जिल्हा निबंधक. व मुद्रांक जिल्हाधिकारी.
4) सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी. मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा.---------------------------

- सर्व दुय्यम निबंधक / सह दुय्यम निबंधक यांच्या निदर्शनास उपरोक्त परीपत्रक आणुन द्यावे. या बाबतीत सर्व दुय्यम निबंधक / सह दुय्यम निबंधक यांनी अश्या दस्ताची नोंदणी परस्पर केल्यास सह दुय्यम निबंधक/दुय्यम निबंधक यांना जबाबदार धरण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
- सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी उपरोक्त नमुद दस्तऐवज अभिनिर्णय / चुमुशु खाली प्रमाणीत केल्यावर दि. 24/11/2014 च्या तात्काळ तपासणी परिपत्रकात नमुद कार्यवाहीसाठी मुंबई विभागातील मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी अपर मुद्रांक नियंत्रक यांचेकडे व इतरत्र विभागातील सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी नोंदणी उपमहानिरीक्षक यांचेकडे पाठवावी व परिपत्रकात विषद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**निर्गमित**

(नयना बोंदार्डे (गुरव))
**सह नोंदणी महानिरीक्षक तथा**
**मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**